ePaper

## तर 1996 सालीच शरद पवार पंतप्रधान झाले असते : प्रफुल्ल पटेल



| वर्ष - 7 | अंक -51 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- पुणेकरांना पाणीटंचाईची भीती!
- 'मोदी@9 जनसंपर्क
- सत्तेतील कुरघोडी!


www.mahaenews.com | शनिवार, दि. 17 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आमदार बनसोडे यांचे 'एक तीर दो निशाण'

# अन् राष्ट्रवादीला 'गर्भीत इशारा'!

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची थेट कार्यालियात भेट

### पक्षांतर्गत 'साईडट्राईक' केल्याने बनसोडेंची नाराजी?



| पिंपरी-चिंचवड | महाईन्यूज | प्रतिनिधी |

**"राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पिंपरी विधानसभेतील आमदार अण्णा बनसोडे यांची थेट कार्यालयात जावून भेट घेतली. अनुभवी आणि मातब्बर नेता असतानाही पक्षांतर्गत कुरघोडींमुळे 'साईडट्राईक' झालेले बनसोडे यांची 'दिल-दोस्ती' राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांना गर्भीत इशारा मानला जात आहे.**

महाविकास आघाडीच्या सत्ताकाळापासून आमदार अण्णा बनसोडे व पक्षाच्या स्थानिक नेत्यांमध्ये मनभेद आहेत. त्यामुळे अनेकदार बनसोडे नाराज असल्याची चर्चा झाली. मात्र, आपण राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांचे 'कट्टर' आहोत, हे बनसोडे यांनी कायम सांगीतले. मात्र, अजित पवार यांचा हाच कट्टर समर्थक, आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गळ्यातील 'ताईत' बनला आहे.

शहरातील 'शासन आपल्या दारी' या कार्यक्रमाला आलेल्या मुख्यमंत्र्यांनी आमदार बनसोडे यांच्या कार्यालयाच्या 'दारी' हजेरी लावली. मात्र, ही सदिच्छा भेट असल्याचे सांगत सारवासारवही केली. काही महिन्यांपूर्वी एकनाथ शिंदे आणि आमदार बनसोडे यांनी




एकाच गाडीतून प्रवास केला होता. तेव्हा देखील अशीच चर्चा झाली होती. मात्र, शहरात भाजपाचे तीन आमदार, शिवसेनेचे एक खासदार असतानाही मुख्यमंत्री विरोधी पक्षातील राष्ट्रवादीच्या आमदारांच्या कार्यालयात भेट देतात. ती केवळ सदिच्छा नव्हे, तर राजकीय दिशा ठरवणारी भेट आहे, असा दावा जाणकारांकडून केला जातो.

### राष्ट्रवादीत मानसन्मान मिळेना?

» चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीनंतर बनसोडे आणि स्थानिक नेत्यांमध्ये मतभेद उफाळून आले असून, बनसोडे यांना पक्ष संघटनेतील कार्यक्रमांना मानाने बोलवले जात नाही, असा बनसोडे समर्थकांचा दावा आहे. कारण, बनसोडे यांनी चिंचवडची निवडणूक बिनविरोध व्हावी आणि स्व. लक्ष्मण जगताप यांच्या आदरांजली द्यावी, अशी ठाम भूमिका घेतली होती. मात्र, या भूमिकेला पक्षातील स्थानिक नेत्यांनी विरोध केला. आमदार बनसोडे यांना मानसन्मान दिला जात नाही. याबाबत काही समर्थकांनी थेट अजित पवार यांच्याकडे लेखी तक्रार केल्याचेही सांगितले जाते. विशेष म्हणजे, बनसोडे यांनी महापालिका प्रशासनाविरोधात घेतलेल्या अनेक आक्रमक भूमिकांबाबत शहर राष्ट्रवादीकडून कोणताही पाठिंबा दर्शवला जात नाही. एखाद्या मुद्यावर बनसोडे यांनी आवाज उठवला, तर त्या मुद्यावर स्थानिक पदाधिकारी उदासीन भूमिका घेतात. महत्त्वाचे म्हणजे, भाजपातील नाराज नगरसेविकेला पिंपरी विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादीकडून लढवण्यासाठी पक्षातील एक गट कार्यरत आहे. यामुळेच बनसोडे आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांमध्ये 'मनभेद' झाले आहेत, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

### राष्ट्रवादीला इशारा अन् भाजपा 'चेकमेट'

» मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्याची सूत्रे हाती घेतल्यापासून आमदार बनसोडे यांनी दोनदा जाहीरपणे त्यांची भेट घेतली आणि एकत्रित चर्चाही केली. याउलट, अजित पवार ज्यावेळी भाजपाच्या वाटेवर आहेत, अशी चर्चा होती. त्यावेळीही "अजितदादा जो निर्णय घेतील, त्यांच्या सोबत असेन..." असा दावा जाहीरपणे बनसोडे यांनी केला होता. त्यामुळे बनसोडे यांना राष्ट्रवादीशी फार जिव्हाळा आहे, असे दिसत नाही. दुसरीकडे, आगामी २०२४ मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाने पिंपरी विधानसभा मतदार संघातून निवडणूक प्रमुखपदी अमित गोरखे यांची निवड करुन मतदार संघावर पकड मजबूत करण्याचा प्रयत्न केला आहे. तर चिंचवड आणि भोसरी मतदार संघात विद्यमान आमदार भाजपाचे आहेत. त्यामुळे शहरातील एकतरी मतदार संघ शिवसेना शिंदे गटाला सोडावा लागणार आहे. मग, जागावाटपात शिंदे गटाला पिंपरीची जागा सोडली, तर बनसोडे शिवसेना (शिंदे गटाचे) उमेदवार असू शकतील आणि भाजपाला 'महायुती'चा धर्म पाळावा लागेल. आता राष्ट्रवादी आणि भाजपाच्या स्थानिक नेत्यांनी आव्हान दिलेच, तर आपल्यासाठी शिवसेना (शिंदे गटाची) दारे खुली आहेत आणि तर दुसरीकडे भाजपा+ शिवसेना महायुतीची 'ऑफर' मिळू शकते, अशी 'एक तीर दोन निशाण' रणनिती आमदार बनसोडे यांनी आखली आहे, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

# सौर ऊर्जा निर्मिती महाग!

## महावितरणनं केलेला दावा ठरतोय चुकीचा, ग्राहकांमध्ये नाराजीचा सूर

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**घराच्या किंवा इमारतीच्या छतावर सौर ऊर्जा निर्मिती यंत्रणा (रुफ टॉप सोलर सिस्टीम) बसविण्यासाठी 'महावितरण'ने जाहीर केलेले दर आणि प्रत्यक्षात ग्राहकांना येणाऱ्या खर्चात प्रचंड तफावत निदर्शनास येत आहे. तीन किलोवॅट क्षमतेची छतावरील सौर ऊर्जा निर्मिती यंत्रणा बसविण्यासाठी ग्राहकाला ४० टक्के अनुदान मिळून सुमारे ७४ हजार रुपये खर्च येतो असा 'महावितरण'चा दावा आहे; परंतु, सौर यंत्रणा पुरवठादारांकडून याच क्षमतेच्या सौरऊर्जा निर्मिती यंत्रणेसाठी अनुदानासह सुमारे एक लाख ३६ हजार रुपये ते एक लाख ७० हजार रुपये आकारले जात आहेत. परिणामी, 'महावितरण'चे दावे दिशाभूल करणारे ठरत असल्याची नाराजी वीज ग्राहकांकडून व्यक्त केली जात आहे.**



घराच्या छतावर सौर पॅनेल बसवून त्याद्वारे निर्माण झालेली वीज वापरून अतिरिक्त वीज 'महावितरण'ला विकल्यास वीजबिलात मोठी बचत होते. त्यामुळे घराच्या छतावर सौर ऊर्जा निर्मिती यंत्रणा बसविण्याकडे ग्राहकांचा कल वाढत आहे. 'महावितरण'च्या पुणे परिमंडळात १०,१७० रूफ टॉप सोलार पॅनेल कार्यान्वित झाले असून, त्यातून तब्बल २५३.९४ मेगावॉट क्षमतेची सौर ऊर्जा निर्माण होत आहे. सौरऊर्जा निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी रूफ टॉप सोलार यंत्रणा बसविणाऱ्या घरगुती ग्राहकांना केंद्रीय नवीन व नवीकरणीय मंत्रालयाकडून अनुदान दिले जाते. त्याचे दरपत्रकही निश्चित करण्यात आले आहे. त्या आधारे खुल्या बाजारात तीन किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा निर्मिती यंत्रणेसाठी सुमारे १ लाख २४ हजार रुपयांचा खर्च येतो. त्यावर केंद्र सरकारकडून सुमारे ४८ हजार रुपये अनुदान मिळते. त्यामुळे संबंधित ग्राहकाला जवळपास ७४ हजार ४०० रुपयांचा खर्च येतो, असा दावा 'महावितरण'कडून केला जात आहे. मात्र, प्रत्यक्षात सौर यंत्रणा पुरवठादारांकडून महावितरणच्या दाव्यापेक्षा दुपटीहून अधिक पैसे आकारले जात असून, महावितरणने दरपत्रकाची काटेकोर अंमलबजावणी करण्याची आग्रही मागणी ग्राहकांकडून केली जात आहे.

### असे मिळते अनुदान

**» सौर ऊर्जा निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी रूफ टॉप सोलार यंत्रणा बसविणाऱ्या घरगुती ग्राहकांना एक ते तीन किलोवॅटपर्यंत ४० टक्के आणि तीन किलोवॅटपेक्षा अधिक ते दहा किलोवॅटपर्यंत वीस टक्के अनुदान देण्यात येते. सामूहिक वापरासाठी पाचशे किलोवॅटपर्यंत; परंतु प्रत्येक घरासाठी दहा किलोवॅट मर्यादेसह गृहनिर्माण सोसायट्या व निवासी कल्याणकारी संघटनांच्या ग्राहकांना वीस टक्के अनुदान देण्यात येते.**

" सौर ऊर्जा निर्मिती यंत्रणेचा अविभाज्य भाग असलेले 'नेटमीटरिंग'चे शुल्क व त्याची चाचणी, 'अर्थिंग', 'लायटनिंग अरेस्टर'साठीही ग्राहकांकडून अतिरिक्त पैसे उकळले जातात. त्यामुळे ७४ हजार रुपयांत सौर यंत्रणा बसविण्याचे महावितरणचे दावे दिशाभूल करणारे आहेत. प्रत्यक्षात ग्राहकांना सौरऊर्जा निर्मिती यंत्रणा बसविण्यासाठी दुपटीहून अधिक खर्च येत आहे. हे महागडे दर पाहता महावितरण खरोखरच सौरऊर्जा निर्मितीला प्रोत्साहन देत आहे का, असा प्रश्न निर्माण होत आहे.

**- डॉ. संदीप कडवे,** ग्राहक, वाकड

" छतावरील सौरऊर्जा निर्मिती यंत्रणा बसविण्यास प्रोत्साहन देण्यासाठी केंद्रीय नवीन व नवीकरणीय मंत्रालयाने अनुदानाचे दर निश्चित केले आहेत. त्या आधारे सौरऊर्जा निर्मिती यंत्रणा बसविण्याचे किमान दर ठरविण्यात आले आहेत. मात्र, त्यामध्ये वस्तू व सेवा कर (जीएसटी), नेटमीटरिंगची खरेदी व त्याचे चाचणी शुल्क, ग्राहकांच्या आवश्यकतेनुसार सौर पॅनेलची गुणवत्ता व सुविधा, त्याचे वायरिंग, स्ट्रक्चर कॉस्ट यांचा समावेश नाही, असेही या दरपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे. गेल्या दोन वर्षांत सौर पॅनेलच्या किमती वाढल्या असून, त्यावर आयात शुल्कही लावण्यात आले आहे. सरकारचे सौर ऊर्जा निर्मिती यंत्रणेचे दरपत्रक दोन वर्षे जुने असून, त्यामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे.

**- रोहन उपासनी,** अध्यक्ष, महाराष्ट्र सोलर मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन

---

# पुण्याजवळील मांदेडे गाव होणार कर्बभाररहित!

## हवामान बदलांना सकारात्मक प्रतिसाद देणारे गाव

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जैवइंधने आणि जैव रासायनिक क्षेत्रांमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान तसेच अभियांत्रिकी सेवा पुरवणाऱ्या जागतिक कीर्तीच्या प्राज इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनीच्या संकल्पनेतून गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स या संस्थेच्या सहकार्याने पुणे जिल्ह्याच्या मुळशी तालुक्यातील पौड जवळील मांदेडे हे गाव 'नेट झीरो' अर्थात कर्बभाररहित आणि हवामान बदलांना सकारात्मक प्रतिसाद देऊ शकणारे गाव म्हणून विकसित करण्यात येणार आहे, अशी घोषणा प्राजचे संस्थापक व कार्यकारी अध्यक्ष डॉ प्रमोद चौधरी यांनी आज पुण्यात झालेल्या एका पत्रकार परिषदेत केली.**



या उपक्रमासाठी सुप्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक प्रवीण तरडे हे 'ब्रँड ॲम्बॅसिडर' असतील, अशी माहितीही डॉ. चौधरी यांनी दिली. उपक्रमाच्या बोधचिन्हाचे अनावरण देखील यावेळी करण्यात आले. गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्सच्या सेंटर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट विभागाचे संचालक डॉ. गुरुदास नुलकर, मांदेडे गावाच्या सरपंच सविता शिवाजी वीर, प्रवीण तरडे आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते. या उपक्रमाविषयी अधिक माहिती देताना डॉ. प्रमोद चौधरी म्हणाले, "हरितगृह वायूंचा गावपातळीवरील उत्सर्ग कमी करण्यासाठी सातत्याने कृती कार्यक्रम राबवित गावाचा विकास साधण्याच्या हेतूने प्राजने हा उपक्रम हाती घेतला. या अंतर्गत आरोग्य, ऊर्जा, पाणी, उदरनिर्वाह आणि घनकचरा तसेच सांडपाणी व्यवस्थापन आदी विषयांवर काम करीत त्यांवर तोडगा काढण्याचा प्राजचा मानस आहे. चालू आर्थिक वर्षापासून सुरू करण्यात येत असलेला हा उपक्रम पुढील दोन वर्षांत पूर्ण होईल. "गावाच्या हद्दीतून होणाऱ्या उत्सर्गाचे स्रोत शोधून त्यांना जैवाधारित संपीडित जैववायू, बायोमोबिलिटी आणि बायोप्रिझम या तंत्रज्ञानाच्या आधारे इतर प्रभावी पर्याय उपलब्ध करून देणे आणि पर्यायाने उत्सर्ग कमी करणे यासाठी प्राज प्रयत्नशील असेल. पाणलोट व्यवस्थापन योजना, ऊर्जानिर्मितीक्षम पिकांची लागवड, गावात उभारलेल्या जैवप्रकल्पांसाठीचे पुरवठासाखळी व्यवस्थापन, त्यादृष्टीने अतिरिक्त पिक अवशेषांचे आणि औद्योगिक वापरातील कच्च्या मालाचे व्यवस्थापन यासंदर्भाने देखील गावकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येईल." असे ते म्हणाले.

### ग्रामीण अर्थव्यवस्था दुबळी

**» साधनसंपत्तीच्या पारंपरिक व्यवस्थापन पद्धती लोप पावत असून निसर्गसंपदेचे शोषण करण्याची वृत्ती देखील सर्वत्र वाढीस लागली आहे. या जोडीला दुष्काळ, अतिपावसाने अचानक येणारे पूर, दरडी कोसळणे, पिकांची हानी किंवा उत्पादनात घट, असे हवामान बदलांच्या दुष्परिणामांनाही गावांना सामोरे जावे लागत आहे. परिणामी शेतीतील रासायनिक खतांचा वापर वाढत आहे. शहरांकडे स्थलांतरांचे लोंढे वाढत आहेत, वनक्षेत्र घटत आहे आणि एकंदरच ग्रामीण अर्थव्यवस्था दुबळी होत चालली आहे.**

# शेवटच्या नागरिकाला विविध योजनांचा लाभ मिळेपर्यंत ‘शासन आपल्या दारी’ अभियान सुरु राहील!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

‘शासन आपल्या दारी’ या उपक्रमाच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांपर्यंत शासकीय योजना पोहचविण्यासाठी शासन व प्रशासन प्रयत्नशील असून शेवटच्या नागरिकाला विविध योजनांचा लाभ मिळेपर्यंत हे अभियान सुरू राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील ‘शासन आपल्या दारी’ उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते शासकीय योजना व विविध सेवांच्या लाभाचे प्रतिनिधीक स्वरुपात वाटप करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला खासदार श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे, महेश लांडगे, अश्विनी जगताप, माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आयुक्त राहुल महिवाल, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे आदी उपस्थित होते.



## शासकीय योजना व विविध सेवांच्या लाभाचे प्रातिनिधिक स्वरुपात वाटप

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, ‘शासन आपल्या दारी’ अभियानाच्या माध्यमातून प्रशासकीय यंत्रणा गतीमान करण्यात आली आहे. १ एप्रिलपासून या अभियानाची सुरुवात करण्यात आली. पुणे जिल्ह्यात २ लाख ८६ हजार २७८ लाभार्थ्यांना लाभाचे वाटप करण्यात आले. आतापर्यंत राज्यात ३५ लाख नागरिकांपर्यंत शासन पोहोचले आहे. १०४ शिबिराच्या माध्यमातून २८६ कोटी रुपयांचा लाभ नागरिकांना देण्यात आला आहे. या अभियानामुळे कोणीही लाभार्थी लाभापासून वंचित राहणार नाही.

### मंत्रिमंडळाच्या माध्यमातून अनेक जनहिताचे निर्णय..

मंत्रीमंडळाच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेच्या हिताचे अनेक निर्णय घेण्यात आले आहेत. शेतकरी, कष्टकरी, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग बांधव, महिला भगिनींसाठी महत्वाचे निर्णय घेतले. ज्येष्ठ नागरिकांसाठी एसटी प्रवास मोफत व महिलांसाठी प्रवास शुल्कात ५० टक्के सवलत देण्यात आली आहे. शासनाच्या निर्णयांचा सर्वसामान्य जनतेला लाभ होत आहे. ‘नमो शेतकरी महासन्मान निधी’ योजनेनुसार राज्य शासनही ६ हजार रुपये भर घालणार येणार असल्याने १२ हजार इतका वार्षिक लाभ पात्र शेतकरी कुटुंबांना मिळणार आहे. अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई म्हणून एनडीआरएफच्या निकषांच्या दुप्पट निधी देण्याचा आणि सततच्या पावसाने झालेल्या नुकसानीची भरपाई देता यावी यासाठी १ हजार ५०० कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### पिंपरी चिंचवड परिसर विकासासाठी महत्वाचे निर्णय..

पिंपरी चिंचवड विकासासाठी अनेक निर्णय घेतले. २०१८ते २०२३ पर्यंतचे विकास आणि बांधकामाचे अतिरिक्त विकास शुल्क १०० टक्के माफ करण्याचा निर्णय. एप्रिल २०२३ पासून क्षेत्रनिहाय तपासून आकारणीचा निर्णय घेण्यात आला आहे. मोशी येथे छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकासाठी अडीच एकर जागा देण्याचा निर्णय घेतला आहे. पिंपरी चिंचवड हद्दीतील अनधिकृत बांधकामासाठीचा ४६० कोटी रुपयांचा शास्तीकर माफ करण्यात आला आहे. पिंपरी चिंचवड नवनगर प्राधिकरणाच्या भूसंपादनामुळे बाधित झालेल्या भूमिपूत्रांचा प्रश्न सोडविण्यात येईल, असेही ते म्हणाले.

### जिल्ह्याच्या विकासाला गती..

पालखी मार्ग आणि पुणे-मिरज रेल्वे मार्गाच्या भूसंपादनाची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. चांदणी चौकातील कामही पूर्ण होत आहे. जेजुरी तीर्थक्षेत्र विकास आणि वढू बुद्रुक येथे संभाजी महाराज स्मारक काम लवकरच सुरू करण्यात येईल. यशवंतराव चव्हाण स्मारकासाठी ५ कोटी रुपये देण्यात येतील. पुण्यातील नद्यांमधील पाणी निर्मळ राहावे यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून जलशुद्धीकरणासाठी निधी देण्यात आला आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

### महिला सक्षमीकरणासाठी महत्वाची पाऊले...

‘लेक लाडकी लखपती’ ही योजना महिला व मुलींच्या विकासासाठी सुरु करण्यात आली आहे. महिलांना सक्षम करण्यासाठी महिला बचत गटाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहे. प्रशासनाने बचत गटाच्या उत्पादनांना बाजार उपलब्ध करून देण्याचा आणि फिरता निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात येईल. राज्यात २ कोटी पेक्षा अधिक महिलांना शासनाच्या योजनांचा लाभ देण्याचा प्रयत्न आहे. संजय गांधी निराधार योजनेसाठी उत्पन्नाच्या दाखल्याची मुदत ५ वर्ष करण्यात येईल, असेही श्री.शिंदे यांनी सांगितले.

### राज्याच्या सर्वांगीण विकासाला चालना..

लोकांचे जीवन सुखी, आनंदी करणे आणि त्यांच्या आयुष्यात अनुकूल बदल घडवून आणणे हे शासनाचे उद्दीष्ट आहे. म्हणूनच सर्वासामान्य जनतेला केंद्रस्थानी घेवून त्यांच्या हिताचे निर्णय घेण्यात येत आहेत. राज्यात पायाभूत सुविधांचे अनेक मोठे प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र प्रथम स्थानावर असून गेल्या सुमारे ११ महिन्यात १ लाख १८ हजार कोटींची गुंतवणूक महाराष्ट्रात आणल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

खासदार श्री.बारणे म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शासनातर्फे जनतेच्या समस्या सोडविण्याचे प्रयत्न होत आहेत. नागरिकांना शासन आपल्या दारी अभियानांतर्गत एकाच ठिकाणी विविध योजनांचा लाभ देण्यात येत आहेत. आमदार श्रीमती जगताप यांनीही यावेळी विचार व्यक्त केले.

---

# ‘मोदी@9 जनसंपर्क अभियानांतर्गत भोसरीत युवा मोर्चाची ‘रॅली’

## युवकांचा मोठा प्रतिसाद : उपाध्यक्ष शिवराज लांडगे यांचा पुढाकार

। पिंपरी । महाईन्यूज

‘मोदी@9 जनसंपर्क अभियानांतर्गत भोसरीत युवा मोर्चाच्या वतीने ‘भव्य ‘रॅली’ काढण्यात आली. भाजपा युवा मोर्चा उपाध्यक्ष शिवराज लांडगे व भोसरी चऱ्होली मंडलाध्यक्ष उदय गायकवाड यांच्या पुढाकाराने भोसरी येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून बाईक रॅलीची सुरुवात करण्यात आली.


यावेळी प्रमुख उपस्थिती, भाजपा युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर, राष्ट्रीय सचिव गौरव गौतम, शहराध्यक्ष संकेत चोंधे, महामंत्री सुदर्शन पाटसकर, महाराष्ट्र प्रदेश सचिव सुशील मेंगडे, प्रदेश सदस्य गणेश वरपे, अजित कुलथे सचिन जायभाय, युवा नेते योगेश लांडगे, शहर सरचिटणीस दिनेश यादव तसेच शहर भाजपा युवा मोर्चा पदाधिकाऱ्यांसह शेकडो कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाजपा युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर यांनी मोदी सरकार मागील ९ वर्षांमध्ये गोरगरीब जनतेला केंद्रस्थानी ठेवून कार्यरत असल्याचे सांगितले.



### इंद्रायणीनगर येथे युवा वॉरियर्स शाखेचे उद्घाटन...

तरुणांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी भाजप युवा मोर्चाच्या मार्फत 18 ते 25 या वयोगटातील तरुणांसाठी ही संकल्पना राज्यभर राबवण्यात येत आहे. युवा मोर्चा उपाध्यक्ष शिवराज लांडगे यांच्या पुढाकाराने प्रभाग क्रमांक आठ इंद्रायणीनगर येथे रोहन उगले यांच्या अध्यक्षतेखाली 40 तरुणांची कार्यकारणी जाहीर करण्यात आली.

# व्यूह रचले; शंख फुंकले!




**राजकारकितीही पराभव झाले तरी खचून न जाता लगेच दुसऱ्या दिवशी कामाला लागायचे आणि पुढच्या निवडणुकांकडे लक्ष केंद्रित करायचे, हा भारतीय जनता पक्षाचा गुण सगळ्या विरोधकांनी आत्मसात करायला हवा..**

कर्नाटकात जबरदस्त पराभव होण्याआधीच भाजपचे लोकसभेसाठीचे राष्ट्रीय महाविजय अभियान सुरू झाले आहे. हा पराभव झाला असला तरी या अभियानाला धक्का लागलेला नाही. उलट, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी येत्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये प्रचाराची प्रमुख धुरा कुणाकडे असेल, हे दाखवून देत जाहीर सभांचा धडाका उडवून दिला आहे. महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८ जागा आहेत आणि केंद्रात कुणाचेही सरकार येण्यासाठी हा आकडा अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे शहा यांच्या प्रचार दौऱ्याच्या पहिल्या फेरीत महाराष्ट्राला आणि त्यातही नांदेडसारख्या विविधांगी वारसा असणाऱ्या शहराला स्थान मिळावे, यात नवल नाही. नांदेड हे मराठवाड्यातले जसे महत्त्वाचे सांस्कृतिक केंद्र आहे; तसेच, जगभरातील शीख समाजासाठी ते तीर्थस्थान आहे. स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी नांदेडसहित मराठवाड्याचा बहुतांश भाग हा निजामाच्या राजवटीत असण्यालाही विशेष संदर्भ आहे. याशिवाय, हे शंकरराव चव्हाण आणि त्यांचे चिरंजीव अशोक चव्हाण यांचे गाव आहे. या साऱ्या पार्श्वभूमीवर शहा यांनी भाजपचा प्रचार कसा दुधारी आणि दुहेरी असेल, याची चुणूक त्यांच्या प्रदीर्घ भाषणात दिली.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हिंदुत्वाला किती उघडपणे आणि किती वेळा आवाहन करायचे, यावर स्वाभाविक मर्यादा येऊ शकतात. तरीही, कर्नाटकातली निवडणूक हातातून जाते आहे, हे लक्षात आल्यावर मोदी यांनी बजरंगबलीला प्रचाराच्या मैदानात उतरविले होते. अमित शहा यांनी नांदेडमध्ये भाषणाचा रोख विकास तसेच हिंदुत्व असा द्विकेंद्री ठेवला. खरे तर लोकसभा निवडणुकीला अजून जवळपास एक वर्ष आहे. अर्थात, तेवढाच काळ महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकांनाही असण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे, शहांनी प्रचाराचाही दुहेरी नारळ वाढविला, असे म्हणायला हरकत नाही. म्हणूनच, त्यांच्या आक्रमक भाषणात त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर कडक टीका केली. शहा यांनी त्या तथाकथित गुप्त बैठकीचा हवाला देण्याची ही पहिली वेळ नाही. मागे मुंबईतील सभेतही त्यांनी तसा दिला होता. शिवसेनेला मुख्यमंत्रिपद देण्याबाबत जे काही या बैठकीत ठरले होते; त्याबाबत खोटे नेमके कोण बोलत आहे, हा सवाल शहांनी लोकांच्या कोर्टात टाकला आहे. पुढील प्रचारात हा मुद्दा वारंवार आला तर नवल नाही. याचे कारण, एकनाथ शिंदे यांच्या 'गद्दारी'च्या आधी उद्धव ठाकरे यांनीच आद्य 'गद्दारी' केली होती, हा मुद्दा भाजपला ठसवायचा आहे. राज्यातील महाविकास आघाडीने काही आठवड्यांपूर्वी जागावाटपाच्या प्राथमिक हालचाली सुरू केल्या होत्या. सध्या त्या रेंगाळलेल्या दिसतात. तितक्यात भाजपने प्रचार मोहिमेची धडाकेबाज सुरुवात करून टाकली. देशभरातील भाजपच्या सभांमध्ये सध्या महत्त्वाकांक्षी दावे केले जात आहेत. म्हणजे, उत्तर प्रदेशात ८० पैकी ८० जागा जिंकायच्या, असा प्रचार सुरू आहे. याच धर्तीवर शहा यांनी महाराष्ट्रात आता ४५ पेक्षा जास्त जागा जिंकू, असे नांदेडला म्हटले. असा ऐतिहासिक विजय मिळवणे याचा अर्थ सर्व विरोधक पूर्णपणे भुईसपाट होणे, असा होतो.

आजची तीन पक्षांची महाविकास आघाडी इतकी काही दुर्बळ दिसत नाही. म्हणजे, एक तर भाजपची पुन्हा जबरदस्त लाट यावी लागेल किंवा राज्यात काहीतरी मोठी राजकीय घडामोड तरी व्हावी लागेल. अर्थात, कोणतीही लाट येवो अथवा न येवो, गंभीर राजकीय पक्षांना सातत्याने जमिनीवर काम करीत राहावे लागते; कार्यकर्त्यांना व मतदारांना हाकारे घालावे लागतात. अशी पार्श्वभूमी तयार झाली असेल तरच संभाव्य लाटेवर नीट स्वार होता येते. कुस्तीआधी ताकद लावून आखाडा खणण्याचे हे काम अमित शहा यांच्या सभेने सुरू झाले. भाजपच्या अनेक नेत्यांना अतिचढ्या आवाजात, आरंभापासून अनावश्यक आक्रमक बोलण्याची सवय लागली आहे. शहा हेही त्यातून सुटलेले दिसत नाहीत. प्रचाराचा नारळ फोडत असताना इतके आक्रमक होण्याची गरज नसते. याउलट, सौम्य स्वरात, आपुलकीचा संवाद साधता आला पाहिजे. अटलबिहारी वाजपेयी यांचे व्हिडिओ पाहून हे शिकता येईल. राहुल गांधी यांना लक्ष्य करून मोदींच्या तुलनेत ते कसे कच्चे व डावे आहेत, हे सांगण्याची भाजपची जुनी रणनीती आहे.

शहाही तसे बोलले. पण ही युक्ती कर्नाटकात चाललेली नाही. मात्र, सलग दोन विजय मिळवूनही भाजपने २०२४ ची लोकसभा निवडणूक किती गंभीरपणे घेतली आहे; याची शहा यांचा झंझावाती दौरा ही खूण आहे. विरोधकांनी वेगाने आघाडी बांधली नाही तर प्रचारातली आघाडी तोडताना पुढे दमछाक होऊ शकते. शहांनी केलेला शंखनाद जसा प्रचाराचा आहे; तसाच विस्कळित विरोधकांना जागविणाराही आहे.

## संपादकीय »

### विलंबातून धडा घ्यावा

***रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने आपले तिमाही पतधोरण जाहीर करताना सातत्याने व्याजदर वाढवत नेले होते. गेल्याच आठवड्यात अनेक तिमाह्यांनंतर प्रथमच रिझर्व्ह बँकेने रेपो दरात वाढ केली नाही.***

एखाद्या अपेक्षापूर्ततेत विलंब झाला तरी मन मोठे करीत देशाची जनता राज्यकर्त्यांना माफ करीत असते. हेतूमागील प्रामाणिकता तेवढी लोकांना भावायला हवी असते. वेळकाढूपणातून सर्व आरोप छू मंतर होण्याची आशा सध्याच्या काळात राहिलेली नाही. 'जंतरमंतर'वरील चिवट आंदोलनांच्या सक्रियतेने अशा शक्यता मावळल्या आहेत. महिला कुस्तीगिरांनी केलेल्या लैंगिक छळाच्या तक्रारीवरून दिल्ली पोलिसांना अखेर सत्तारूढ भाजपचे खासदार आणि भारतीय कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष बृजभूषण शरण सिंह यांच्यावर आरोपपत्र दाखल करावे लागले. उशीर झाला, पण जनरेटा कामी आला. या प्रकरणात केंद्र सरकारकडून प्रारंभीपासून संवादहीनता जाणवली. खेळाडूंनी कष्टाने मिळविलेल्या पदकांच्या गंगार्पणाचा कठोर निर्णय थोपविण्यात बरेच सायास लागले. तसे घडले असते तर थेट देशाच्या छबीवर परिणाम झाला असता.

**सोडून दिलेल्या वयोवृद्ध व्यक्तींसाठी 'वृद्धाश्रम' या विचारापासून काळाची गरज इथपर्यंत आता समाजाची मानसिकता बदलली आहे. वाढत्या आयुर्मर्यादेमुळे वृद्धाश्रमांची गरज वाढती असताना त्यांची संख्या कमी होत आहे. बदलत्या काळामध्ये तग कसा धरायचा, हा प्रश्न वृद्धाश्रमांचे व्यवस्थापन पाहणाऱ्या संस्थांपुढे आहे.**

## आधारकाठी टिकायला हवी!

वृद्धाश्रम म्हणजे टाकून दिलेल्या, सोडून दिलेल्या वयोवृद्ध माणसांचे राहण्याचे ठिकाण, या समजुतीने आता कात टाकली आहे. बदलती जीवनशैली, प्रगत वैद्यकीय तंत्रज्ञान, प्रभावी उपचारपद्धती यामुळे मागील काही वर्षांत आयुर्मान वाढते आहे. पन्नाशीच्या घरात असणारी मुले ८०-८५च्या वयोगटातील पालकांची काळजी घेताना दिसतात. समाजाला वृद्धाश्रमांची गरज अन् महत्त्व दोन्ही पटले आहे.

सामाजिक संस्थांच्या माध्यमातून चालवण्यात येणारे, मोफत तसेच खासगी असे तीन प्रकारचे वृद्धाश्रम मुंबईमध्ये आहेत. १५-२० वर्षांपूर्वी मुंबईमध्ये नोंदणीकृत वृद्धाश्रमांची संख्या दोनशेच्या घरात होती. नोंदणी नसताना केलेल्या संस्थांची त्याहून अधिक. आता मात्र ही संख्या वेगाने कमी झाली आहे. मुंबईमध्ये जागांचे भाव वाढत गेल्यानंतर वृद्धाश्रमांचे व्यवस्थापन करणे अत्यंत जिकिरीचे झाले आहे. मुंबईतून बस्तान हलवून खोपोली, कर्जत, पनवेलकडे वृद्धाश्रम स्थलांतरित झाली. मुंबईतील वाढत्या प्रदूषणामुळे विविध प्रकारच्या व्याधी, सहआजार असलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा सांभाळ करणेही संस्थांना अवघड झाले आहे. लोकसंख्येनुसार वृद्धाश्रमांची उपलब्धता किती व कुठे हवी, त्यातील अंतर्गत व्यवस्था, नियोजन व वैद्यकीय सुविधांची उपलब्धता कशी हवी, यासंदर्भात कागदावर नियमावली



असली, तरीही अंमलबजावणी अभावानेच होते. खर्च वाढता आहे, मात्र सरकारकडून अनुदान व मदतीचा हात तत्परतेने मिळत नाही. सवलतीच्या नावाखाली अनेक निर्बंध लादण्यात आले. परिणामी सेवाव्रत म्हणून पुढे येऊन हे काम करणाऱ्यांचा उत्साह आटला. नैसर्गिक, तसेच मानवनिर्मित आपत्तींमध्ये सीएसआर प्रकल्पांतर्गत येणारी आर्थिक मदत वाढली आहे. मात्र त्याचवेळी ज्येष्ठ नागरिकांसाठी येणाऱ्या निधीमध्ये कपात झाली. २०-२५ वर्षांपूर्वी जेव्हा वृद्धाश्रमांची उपलब्धता असण्याची गरज भासू लागली, तेव्हा अनेक संस्था या सेवाभावी कामात पुढे आल्या. तरुणही जोडले गेले. त्यात नोंदणीकृत अन् कोणतीही नोंद नसलेल्या संस्थांची संख्या

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# बिपरजॉयचा विध्वंस थोपवण्यात यश!

## मुसळधार पावसाचा तडाखा : कच्छ-सौराष्ट्र विभागाला चक्रीवादळाचा फटका

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बिपर्जय' चक्रीवादळाची तीव्रता कमी झाली असून, गुरुवारी रात्री गुजरातला धडकलेल्या या चक्रीवादळामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही, अशी माहिती शुक्रवारी राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाने (एनडीआरएफ) महासंचालक अतुल करवाल यांनी दिली. चक्रीवादळाच्या तडाख्याने २३ जण जखमी झाले असून, कच्छ-सौराष्ट्र विभागाला चक्रीवादळाचा मोठा फटका बसल्याचे सांगण्यात आले. या भागांतील एक हजारांपेक्षा जास्त गावे अंधारात असून, ५१२० इलेक्ट्रिक खांब वादळाने कोसळले आहेत.**



अरबी समुद्रातील चक्रीवादळाने आलेल्या पावसाने गुरुवारी कच्छ आणि गुजरातच्या सौराष्ट्र भागातील काही भागांना झोडपून काढले. गुरुवारी सायंकाळी ६.३० वाजल्यापासून हे चक्रीवादळ जखाऊ बंदराजवळ धडकण्यास सुरुवात झाल्यानंतर संपूर्ण कच्छ जिल्ह्यात मुसळधार पाऊस झाला. 'लँडफॉल'ची प्रक्रिया पहाटे अडीच वाजेपर्यंत सुरू होती. 'एनडीआरएफ'चे महासंचालक अतुल करवाल यांनी दिल्लीत पत्रकारांशी बोलताना सांगितले, 'चक्रीवादळाचा तडाखा बसण्यापूर्वी दोन जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता; परंतु गुजरातमध्ये ते धडकल्यानंतर एकाही व्यक्तीचा मृत्यू झालेला नाही. गुजरात प्रशासन आणि इतर यंत्रणांनी केलेल्या एकत्रित प्रयत्नांमुळे जीवित व वित्तहानी कमी झाली आहे. चक्रीवादळामुळे २३ लोक जखमी झाले आहेत. राज्यातील सुमारे एक हजार गावांचा वीजपुरवठा खंडित झाला आहे. वीजपुरवठा खंडित होत असलेल्या या गावांपैकी सुमारे ४० टक्के गावे कच्छ जिल्ह्यातील आहेत. तेथे चक्रीवादळाचा सर्वाधिक फटका बसला आहे.'

वृत्तसंस्था, कराची : गुजरातमध्ये धडकल्यानंतर कमकुवत झालेल्या 'बिपर्जय' चक्रीवादळाचा फटका पाकिस्तानला बसला असून, मात्र, मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याची कोणतीही नोंद नाही. चक्रीवादळाचा धोका आणि मान्सूनच्या पावसाचा इशारा देणारे सिंधच्या किनारपट्टीवरील केटी शहरातील लोक आता आपापल्या घरी परतत आहेत, असे पाकिस्तान हवामान खात्याने (पीएमडी) म्हटले आहे. 'चक्रीवादळाला तोंड देण्यासाठी पाकिस्तान तयार होता. सुजावलसारख्या सिंधच्या किनारपट्टीभागात समुद्राची पातळी वाढली असली तरी बहुतांश लोकांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे,' अशी माहिती हवामान विभागाच्या मंत्री शेरी रेहमान यांनी दिली. पाकिस्तानात वेळीच ६७ हजारांपेक्षा जास्त नागरिकांचे स्थलांतर करण्यात आले, त्यामुळे मोठा धोका टळल्याचे रेहमान यांनी सांगितले.

### राजस्थानमध्येही पाऊस

जयपूर : 'बिपर्जय' चक्रीवादळामुळे शुक्रवारी राजस्थानच्या जालोर, बारमेर जिल्ह्यात जोरदार पाऊस झाला. गुरुवारी रात्रीपासून या भागांत पावसाला सुरुवात झाली. दुपारपर्यंत अनेक भागात ७० ते ८० मिलिमिटर पावसाने हजेरी लावली. शुक्रवारी रात्रीही या भागामध्ये जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असून, अनेक भागांत २०० मिलिमीटर पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

### असे झाले नुकसान

- चक्रीवादळात २३ जण जखमी; जीवितहानी नाही
- सीमाभागातील रस्त्यांचे मोठे नुकसान, मुसळधार पावसाचा तडाखा
- चक्रीवादळाने ५१२० विजेचे खांब पडले.
- एकूण ४६०० गावे अंधारात; त्यापैकी ३८५० गावांतील वीजपुरवठा पूर्ववत
- 'एनडीआरएफ'कडून रूपेन बंदर येथे १२७ जणांची सुटका
- विविध ठिकाणी ७०० पेक्षा जास्त झाडे उन्मळून पडली.
- विविध भागांतील ५०० कच्ची घरे आणि झोपड्यांचे नुकसान

---

## भारत राष्ट्र समिती पक्षाला महाराष्ट्रात आणण्याची सत्ताधाऱ्यांची खेळी, शरद पवार यांचा आरोप

। जळगाव । महाईन्यूज

गेल्या निवडणुकीत आम्हाला वंचित आघाडीचा मोठा फटका बसला होता. त्यामुळे याही वेळी भारत राष्ट्र समिती पक्षाला महाराष्ट्रात आणण्याची खेळी राज्यातील सत्ताधाऱ्यांची असण्याची शक्यता आहे. त्यामुळे भारत राष्ट्र समिती पक्ष हा सत्ताधाऱ्यांची बी टीम असण्याची शक्यता आहे. यावेळी भारत राष्ट्र समिती पक्षाचा फटकाही बसू शकतो, अशी शक्यता राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी वर्तविली.

अमळनेर येथे राष्ट्रवादी काँग्रेस ग्रंथालय विभागातर्फे शुक्रवारी राज्यस्तरीय कार्यकर्ता शिबिर घेण्यात आले. त्यानिमित्ताने पवार हे अमळनेरमध्ये आले असता, त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना



शेतकऱ्यांच्या प्रश्नी सरकारला गांभीर्य नसल्याचा आरोप केला. यावेळी आमदार एकनाथ खडसे, अनिल पाटील उपस्थित होते. पवार यांनी सद्यःस्थितीतील राजकीय घडामोडींवरही भाष्य केले. पवार यांनी जाहिरातीवरून मुख्यमंत्र्यांना टोला लगावला. महाराष्ट्राचे भाग्य आहे की अत्यंत लोकप्रिय मुख्यमंत्री म्हणून एका व्यक्तीबद्दलच्या नावलौकिकाची जाहिरात त्यांच्या कुठल्या हितचिंतकांनी दिली, हे आम्हाला माहिती नाही. आमचा समज होता की, हे सरकार भाजपमुळे बनले आहे.

---

## ७०० वाहनांचा ताफा, ३०० किमीचा प्रवास!

### सिंधियांचे विश्वासू नेते बैजनाथ सिंह यांची काँग्रेसमध्ये भव्य 'घरवापसी'

। गांधीनगर ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांचे विश्वासू सहकारी आणि शिवपुरीचे अनुभवी नेते बैजनाथ सिंह यांनी मार्च २०२० मध्ये सिंधिया यांच्यासह बंडखोरीचे निशाण फडकवून भाजपामध्ये प्रवेश केला होता. ज्यामुळे मध्य प्रदेशमधील कमलनाथ यांचे सरकार कोसळले होते. त्या घटनेला आता दोन वर्ष पूर्ण झाले असून बैजनाथ सिंह यांची घरवापसी झाली आहे. बैजनाथ यांचा काँग्रेसमध्ये प्रवेशाचा एक भव्य इव्हेंट केला गेला. शिवपुरी ते भोपाळ असा ३०० किलोमीटरचा प्रवास ७०० वाहनांच्या ताफ्यामधून करत बैजनाथ काँग्रेसमध्ये कार्यकर्त्यांच्या लवाजम्यासह डेरेदाखल झाले. द इंडियन एक्सप्रेसशी बोलताना बैजनाथ म्हणाले, "मी ७०० वाहनांचा ताफा आणून एकप्रकारे तिकडे 'संदेश' दिला आहे. माझे आणि सिंधिया यांच्या कुटुंबाचे जवळचे संबंध राहिले आहेत. मी सिंधिया यांच्यासह भाजपामध्ये गेलो. पण तिथे माझी घुसमट झाली. आज मी मुक्त होत आहे. काँग्रेसमध्ये परतल्याबद्दल मला आनंद वाटतोय."**

७३ वर्षीय बैजनाथ सिंह यांची भोपाळ येथे काँग्रेसचे वरिष्ठ नेते वाट पाहत होते. माजी मुख्यमंत्री कमलनाथ आणि दिग्विजय सिंह पक्षप्रवेशाच्या कार्यक्रमाला उपस्थित होते. बैजनाथ यांच्यासमवेत भाजपाचे १५ जिल्हापातळीवरचे



नेतेही काँग्रेसमध्ये दाखल झाले.

कमलनाथ यांनी बैजनाथ यांचे स्वागत करत असताना सिंधिया यांनाही उपरोधिक टोला मारला. ते म्हणाले, "आज मला खूप आनंद वाटत आहे. कारण बैजनाथ हे काँग्रेसला पाठिंबा देण्यासाठी आलेले नसून ते सत्यासाठी इथे आले आहेत. बैजनाथ यांनी तरुण असताना राजकारणात प्रवेश केला होता. त्यांनी शिवपुरी भूमी विकास बँकेचे संचालक पद अनेक दशके सांभाळले. दिग्विजय सिंह यांचे सुपुत्र आणि काँग्रेसचे आमदार जयवर्धन सिंह यांनी बैजनाथ यांना पुन्हा काँग्रेसमध्ये आणण्यासाठी प्रयत्न केले. द इंडियन एक्सप्रेसशी बोलत असताना जयवर्धन सिंह म्हणाले की, बैजनाथ हे निष्ठावान काँग्रेस कार्यकर्ते आहेत. सिंधिया यांच्यासह त्यांनी भाजपामध्ये प्रवेश घेतला. तीन वर्षांनंतर त्यांना आता सत्य उमगले आहे. कमलनाथ करत असलेले प्रयत्न त्यांना दिसले आणि त्यांनी पुन्हा पक्षात येण्याचा निर्णय घेतला.

# बहुमान! प्रिया मराठे गाजवणार मिरा - भाईंदर पालिका

अभिनेत्री प्रिया मराठेला आजवर आपण अनेक हिंदी-मराठी मालिकांमधून भेटत पाहिलंय. तिने साकारलेल्या खलनायकी व्यक्तिरेखांची छाप आजही प्रेक्षकांच्या मनावर कायम आहे. सध्या प्रिया 'तुझेत मी गीत गात आहे' या मालिकेत मोनिका ही व्यक्तिरेखा साकारत आहे. खऱ्या आयुष्यात प्रिया मराठेच्या शिरपेचात मोठा बहुमान प्राप्त झालाय.

मिरा-भाईंदर महानगर पालिकेच्या माध्यमातून राबवण्यात आलेल्या 'स्वच्छता सर्वेक्षण २०२३' उपक्रमासाठी प्रिया मराठे ब्रँड ॲम्बेसेडर झाली आहे. प्रिया मराठेने सोशल मीडियावर पोस्ट करून हि माहिती सर्वांसोबत शेयर केली आहे. मीरा भाईंदर पालिके अंतर्गत प्रिया मराठेचं जंगी स्वागत करण्यात आलं.





प्रिया मराठेने सोशल मीडियावर या उपक्रमाविषयी सविस्तर लिहिलं आहे. प्रिया लिहिते,"मिरा-भाईंदर महानगर पालिका.. 'मला स्वच्छता सर्वेक्षण २०२३' ब्रँड ॲम्बेसेडर बनवल्या बद्दल खूप धन्यवाद.. समाजाप्रती असलेली जबाबदारी थोड्या फार प्रमाणात पूर्ण करता येईल.. आणि ह्याच अभियाना अंतर्गत आज पहिला केलेला कार्यक्रम म्हणजे आपले खरे HEROES

ANI

# शिवानी बावकरचा 'लवंगी मिरची' झटका

'लागीर झालं जी' या मालिकेतून घराघरात पोहोचलेली अभिनेत्री म्हणजे शिवानी बावकर. शिवानीचं सोशल मीडियावर प्रचंड फॅन फॉलोविंग आहे. शिवानी आता मालिका जरी करत नसली तरी तिच्या विविध पोस्ट्स मधून ती कायम चर्चेत असते. शिवानीच्या चाहत्यांसाठी आनंदाची बातमी. शिवानी लवकरच झी मराठीवरील आगामी मालिकेतुन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या मालिकेचं नाव 'लवंगी मिरची'. रुची फिल्म्स या मालिकेची निर्मिती करत असून या मालिकेचा मुहूर्त झालाय. मालिकेत शिवानीची जोडी अभिनेता तन्मय जक्का सोबत दिसणार आहे. तन्मयची हि पहिलीच मालिका असल्याचं समजतंय. तन्मयने याआधी काही म्युझीक व्हिडिओ मध्ये अभिनय केलाय. शिवानी आणि तन्मयची हटके जोडी पाहण्यासाठी त्यांचे फॅन्स उत्सुक आहेत.


शिवानीने याआधी लागीर झालं जी मालिकेत शितलीची भूमिका साकारत प्रेक्षकांच्या मनात घर केलं. या मालिकेतील तिचा अनोख्या गावरान अंदाजाने प्रेक्षकांच्या मनावर जादू केली. या मालिकेनंतर शिवानीने काही म्युझिक व्हिडीओमध्ये अभिनय केला.नंतर शिवनीने 'अलटी पलटी' आणि 'कुसुम' या मालिकांमध्ये अभिनय केलाय.

लवंगी मिरची मालिकेत शिवानी नेमकी कोणती भूमिका साकारणार हे अद्याप गुलदस्त्यात आहे. झी मराठीवर सूरु होणाऱ्या या मालिकेचा स्लॉट अजून ठरला नाहीये. या मालिकेमुळे झी मराठीवरील कोणती मालिका बंद होणार याची माहिती सुद्धा काहीच दिवसांमध्ये स्पष्ट होईल.

लवंगी मिरची मालिकेत शिवानी नेमकी कोणती भूमिका साकारणार हे अद्याप गुलदस्त्यात आहे. झी मराठीवर सूरु होणाऱ्या या मालिकेचा स्लॉट अजून ठरला नाहीये. या मालिकेमुळे झी मराठीवरील कोणती मालिका बंद होणार याची माहिती सुद्धा काहीच दिवसांमध्ये स्पष्ट होईल.



# प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी 'आदिपुरुष' वादात



ओम राऊत दिग्दर्शित 'आदिपुरुष' चित्रपट अखेर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. प्रभास, क्रिती सेनॉन व सैफ अली खान यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाची सोशल मीडियावर चांगलीच चर्चा होत आहे. ट्विटरवर या चित्रपटाबद्दल दोन गट पडल्याचं दिसतंय. प्रभासच्या चाहत्यांनी चित्रपट ब्लॉकब्लस्टर असल्याचं म्हटलंय. पण, दुसरीकडे अनेकांना मात्र विविध कारणांनी हा चित्रपट फारसा आवडला नाही. त्यामुळे ते चित्रपटातील कलाकार व दिग्दर्शकावर टीका करीत आहेत.

'आदिपुरुष'बाबत नाराजी व्यक्त केली आहे. या चित्रपटाविरोधात हिंदू सेनेच्या वतीने दिल्ली उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. या चित्रपटामुळे 'रामायण', 'भगवान श्रीराम' आणि देशाच्या संस्कृतीची खिल्ली उडवली जात असल्याचे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे.

दिल्ली उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या या याचिकेत संघटनेने चित्रपटावर अनेक आरोप केले आहेत. या चित्रपटात 'रामायण', 'भगवान श्रीराम' आणि हिंदू संस्कृतीची खिल्ली उडवली आहे, असे याचिकेत म्हटले आहे. याशिवाय हिंदू सेनेच्या राष्ट्रीय अध्यक्षांनी या याचिकेत 'आदिपुरुष'मधील रावण, भगवान श्रीराम, माता सीता आणि हनुमान यांच्याशी संबंधित कथित आक्षेपार्ह दृश्ये हटवण्याची मागणीही दिल्ली न्यायालयाकडे केली आहे. हे दृश्य रामायणातील धार्मिक पात्रांच्या चित्रणाच्या विरुद्ध असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. SACNILK च्या अहवालानुसार, 'आदिपुरुष' प्रदर्शित होण्यापूर्वीच चित्रपटाच्या सुमारे १० लाख तिकिटांचे ॲडव्हान्स बुकिंग करण्यात आले होते.

# विजय देवरकोंडा पडद्यावर पहिल्यांदाच दिसणार पोलिसाच्या अवतारात

साउथ फिल्म इंडस्ट्रीचा सुपरस्टार विजय देवरकोंडा याने त्याच्या पुढील तेलगू चित्रपट VD12 साठी गौतम तिन्नुरीसोबत हातमिळवणी केली आहे. अभिनेत्याने चित्रपटाचे पोस्टर शेअर केले आहे, ज्यामध्ये त्याचा फर्स्ट लूक देखील पाहायला मिळत आहे. हे पाहिल्यानंतर चाहत्यांची उत्कंठा वाढली आहे. यावेळी विजय देवरकोंडा पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार असल्याचे पोस्टरवरून स्पष्ट झाले आहे. याआधी त्याने केवळ रोमँटिक आणि ॲक्शन भूमिका केल्या आहेत. मोठ्या पडद्यावर त्याला पोलिसांच्या अवतारात पाहणे खूप मनोरंजक असेल.



विजय देवराकोंडाने त्यांच्या ट्विटर हँडलवर VD12 चे पोस्टर शेअर केले आहे. विजय देवरकोंडा अंधारात उभा असून तो खाकी वर्दीत दिसतोय. त्याच्या चेहऱ्यावर कापड बांधले आहे, त्यामुळे त्याचा लूक समोर आलेला नाही. पोस्टरमध्ये पाण्याच्या मध्यभागी एक जळणारे जहाजही दिसत आहे.पोस्टर शेअर करताना विजयने कॅप्शनमध्ये लिहिले की, 'द स्क्रिप्ट, द टीम, माय नेक्स्ट'. या कॅप्शनवरून हा चित्रपट खूपच इंटरेस्टिंग असणार आहे असे दिसते. या चित्रपटाचे लेखन गौतम तिन्नुरी यांनी केले असून दिग्दर्शनाची जबाबदारी देखील त्यांनी घेतली आहे. यापूर्वी गौतमने जर्सी या स्पोर्ट्स-ड्रामा चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगला व्यवसाय केला.

# ऑस्ट्रेलियाला इंग्लंडने आणले जमिनीवर!

## पहिल्याच दिवशी जो रुटचे शतक: ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजीचे कच्चे दुवे

। बर्मिंगहम ।

महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आशिया ऑस्ट्रेलियाने WTC FINAL मध्ये दणदणीत विजय मिळवला होता. या यशानंतर ऑस्ट्रेलियाचा संघ हवेत होता. पण त्यांना जमिनीवर आणण्याचे काम आता इंग्लंडच्या संघान चोख बजावले आहे. सामन्याच्या पहिल्याच दिवशी जो रुटने शतक करत ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजीचे कच्चे दुवे सर्वांसमोर आणले आहेत. इंग्लंडने ऑस्ट्रेलियाला कसोटी सामन्याच्या पहिल्याच दिवशी चांगलेच धारेवर धरले. जो रुटने नाबाद ११८ धावांची खेळी साकारली आणि त्यामुळे इंग्लंडने आपला पहिला डाव पहिल्याच दिवशी घोषित केला.**




इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात आज ॲशेस मालिकेला सुरुवात झाली. पण या सामन्याच्या पहिल्याच दिवशी इंग्लंडने ऑस्ट्रेलियाचा गोलंदाजीचा चांगलाच समाचार घेतला. इंग्लंडने टॉस जिंकला आणि त्यांचा कर्णधार बेन स्टोक्सने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. स्टोक्सचा हा निर्णय किती योग्य होता हे इंग्लंडच्या फलंदाजांनी पहिल्याच दिवशी दाखवून दिले. ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजीचा त्यांनी खरपूस समाचार घेतला आणि कसोटीमध्ये वनडे स्टाइल फलंदाजीचा नमुना त्यांनी पेश केला. इंग्लंडला बेन बकेटच्या रुपात २२ धावांवर असताना पहिला धक्का बसला. पण त्यानंतर सलामीवीर झॅक क्रॉवली आणि ऑली पोप यांनी दमदार फलंदाजी केली. या दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी ७० धावांची भागदारी रचली. पण त्यानंतर ऑलीला नॅथन लायनने बाद केले आणि इंग्लंडला दुसरा धक्का बसला. त्यानंतर क्रॉवलीने आपले अर्धशतक पूर्ण केले, पण त्यानंतर तो जास्त काळ खेळपट्टीवर टीकू शकला नाही. क्रॉवलीने यावेळी ६२ धावा केल्या. क्रॉवली बाद झाला पण त्यानंतर रुटची दमदार फलंदाजी पाहण्याचा योग चाहत्यांना आला.

रुटने यावेळी ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजीच्या मर्यादा स्पष्ट केल्या. रुटने यावेळी ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजीचा वरचष्मा कमी करण्याचे काम चोख बजावले, पण दुसरीकडे त्याने इंग्लंडची धावगती चांगली राखण्याचाही यशस्वी प्रयत्न केला. रुटने यावेळी सात चौकार आणि चार षटकारांच्या जोरावर ११८ धावांची अप्रतिम खेळी साकारली. इंग्लंडने त्यानंतर आपला पहिला डाव ८ बाद ३९३ या धावसंख्येवर घोषित करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर ऑस्ट्रेलियाचा संघ खेळायला आला. ऑस्ट्रेलियाची दिवसअखेर ४ षटकांमध्ये बिन बाद १४ अशी स्थिती होती. त्यामुळे इंग्लंडकडून अजूनही ३७९ धावांची दमदार आघाडी आहे.

### आशिया चषकात एकूण सहा देशांचा समावेश

आशिया चषक आता कोणत्या देशांमध्ये आणि कधीपासून सुरु होणार आहे, याती माहिती समोर आली होती. पण या स्पर्धेत भारताच्या गटामध्ये पाकिस्तानसह कोणता देश आहे हे आता समोर आले आहे. त्यामुळे भारतीय संघ बाद फेरीत पोहोचणार की नाही, हे या गोष्टीवरून ठरणार आहे.

आशिया चषकात एकूण सहा देशांचा समावेश करण्यात आला आहे. या स्पर्धेत भारत, पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश अफगाणिस्तान आणि नेपाळ असे सहा देश खेळणार आहेत. या सहा देशांची दोन गटांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. त्यामुळे आशिया चषकातील एका गटात प्रत्येकी तीन संघ असणार आहेत. आशिया चषकातील 'अ' गटात भारत, पाकिस्तान आणि नेपाळ, तर 'ब' गटात अफगाणिस्तान, बांगलादेश आणि श्रीलंका संघ असणार आहेत. गटातील दोन संघ सुपर-४मध्ये दाखल होतील. त्यानंतर सुपर-४मधील अव्वल दोन संघांमध्ये फायनल होईल. या 'फॉरमॅट'नुसार भारत-पाकिस्तान दोन वेळा आमनेसामने येतील आणि दोन्ही संघ अंतिम फेरीत दाखल होण्यात यशस्वी ठरले, तर एकूण तीन वेळा भारत-पाकिस्तान क्रिकेटचा थरार प्रेक्षकांना अनुभवायला मिळणार आहे.


## मुंबई इंडियन्सचा हा धाकड फलंदाज टीम इंडियामध्ये

। नवी दिल्ली ।

महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

यंदाच्या आयपीएल २०२३ मध्ये मुंबई इंडियन्सच्या संघात युवा खेळाडूंनी आपल्या खेळाची चांगलीच छाप सोडली. तर अशाच एका मुंबई इंडियन्समधील खेळाडूला आगामी वेस्ट इंडिज दौऱ्यावर भारताच्या कसोटी संघात आपले स्थान मिळवण्यात यश आले आहे. भारताचा संघ जुलैमध्ये वेस्ट इंडिज दौऱ्यावर जाणार आहे. २ कसोटी, ३ वनडे आणि ५ टी-२० सामने खेळवले जाणार आहेत. पाहूया कोण आहे हा खेळाडू.

भारतीय संघाचा यष्टीरक्षक फलंदाज इशान किशन वेस्ट इंडिज दौऱ्यावर कसोटी संघाचा भाग असणार आहे. टीम इंडियाचे निवडक आणि बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने एनबीटीचे वरिष्ठ क्रीडा प्रतिनिधी विमल कुमार यांच्याशी झालेल्या संवादात ही माहिती दिली आहे. याशिवाय दुलीप ट्रॉफीमधून नाव काढून घेऊन ईशान किशनने रेड बॉल क्रिकेटमध्ये अनास्था व्यक्त केल्याच्या बातमीवर



आश्चर्य व्यक्त केले. निवडकर्त्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की, किशनशी असे कोणतेही संभाषण झालेले नाही ज्यामध्ये त्याला कसोटी क्रिकेट खेळायचे नाही असे म्हटले गेले आहे. या खास संवादात निवडकर्त्याने सांगितले की, एक आठवड्यापूर्वीपर्यंत डब्ल्यूटीसी फायनलमध्ये खेळण्याच्या इतक्या जवळ असलेला खेळाडू पुढच्या कसोटीत खेळण्याची संधी कशी गमावू शकतो. विशेषत: भारतीय क्रिकेटमध्ये सध्या ऋषभ पंतला जर कोणता पर्याय असेल तर तो म्हणजे ईशान किशन.

## सात्त्विक-चिराग जोडी उपांत्य फेरीत, अग्रमानांकित जोडीवर मात, प्रणॉयचीही आगेकूच!

### इंडोनेशिया खुली बॅडिमटन स्पर्धा: नाराओकावर 21-18, 21-16 असा विजय

। जकार्ता ।

महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारताच्या सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या तारांकित जोडीने इंडोनेशियाच्या फजर अल्फियान आणि मोहम्मद रिआन आर्डिआंतो या अग्रमानांकित जोडीला पराभवाचा धक्का देत इंडोनेशिया खुल्या बॅडिमटन स्पर्धेतील (सुपर १००० दर्जा) पुरुष दुहेरीची उपांत्य फेरी गाठली. पुरुष एकेरीत एचएस प्रणॉयनेही लय कायम राखत अंतिम चार खेळाडूंमध्ये स्थान मिळवले.**



सातव्या मानांकित सात्त्विक-चिराग जोडीने इंडोनेशियाच्या जोडीविरुद्ध उत्कृष्ट खेळ केला. भारतीय जोडीने ४१ मिनिटे चाललेल्या सामन्यात २१-१३, २१-१३ असा विजय नोंदवला. सात्त्विक-चिराग जोडीने सामन्याच्या सुरुवातीपासून आक्रमक खेळ केला. त्यांच्या अचूक खेळाचे इंडोनेशियाच्या जोडीकडे उत्तर नव्हते. आता सात्त्विक-चिरागची कोरियाच्या कान्ग मिन्‌क आणि सेव सेउंग जाये या जोडीशी गाठ पडेल.

पुरुष एकेरीच्या सामन्यात प्रणॉयनेही धक्कादायक निकाल नोंदवताना जपानच्या तिसऱ्या मानांकित कोडाई नाराओकावर २१-१८, २१-१६ असा विजय साकारला. उपांत्य फेरीत त्याचा सामना अग्रमानांकित व्हिक्टर ॲक्सेलसेनशी होईल. सामन्यातील पहिल्या गेममध्ये नाराओकाने प्रणॉयसमोर आव्हान उपस्थित केले. मात्र, मोक्याच्या क्षणी प्रणॉयने खेळ उंचावत विजय साकारला. दुसरा गेमही काही काळ चुरशीचा झाला. मात्र, अनुभवी प्रणॉयने संयम राखताना अखेरीस झटपट गुण मिळवत विजय संपादला.

श्रीकांतचे आव्हान संपुष्टात

किदम्बी श्रीकांतला इंडोनेशिया स्पर्धेतील उपांत्यपूर्व सामन्यात चीनच्या ली शी फेंगकडून पराभव पत्करावा लागला. त्यामुळे त्याचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. श्रीकांतने एक तास आणि नऊ मिनिटे चाललेल्या सामन्यात जागतिक क्रमवारीत १०व्या स्थानी असलेल्या फेंगकडून १४-२१, २१-१४, १२-२१ अशी हार पत्करली. या दोन बिगरमानांकित खेळाडूंमधील सामन्यात श्रीकांतला चुकांचा फटका बसला. फेंगच्या डावा पायाला दुखापतही झाली होती, पण याचा त्याच्या खेळावर परिणाम झाला नाही.